| | |
|---|---|
| दाखल तारीख | २९/०३/२०२५ |
| नोंदणी तारीख | २९/०३/२०२५ |
| निर्णय तारीख | १२/०३/२०२६ |
| कालावधी | ०० व., ११ म., दि.०६ |
| CNR No.MHGA050003542025 | |

भाग – अ
(न्यायनिर्णयाची शीर्षक पान)
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (१)]

| | |
|---|---|
| | निशाणी क्र.०६ खाली... |
| **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज यांचे न्यायालयात.**<br>(पिठासीन अधिकारी – सतिश गो. गोरे) | |
| **अपराध क्रमांक व पोलीस स्टेशनचा तपशील** | **अपराध क्र. ४५२/२०२३,**<br>पोलीस स्टेशन, देसाईगंज. |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | १२/०३/२०२६ |
| **प्रकरण क्रमांक** | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २६५/२०२२** |
| **अभियोग पक्ष :** | **महाराष्ट्र शासन** तर्फे<br>पोलीस स्टेशन, देसाईगंज.<br>ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.<br>(मदन बळीराम मडावी, पो.हवा. ब.नं.२३०४) |
| **अभियोग पक्षातर्फे** | **श्री. आर.डब्ल्यु.सकिनलावार,**<br>विशेष सहायक सरकारी अधिवक्ता |
| **आरोपी :** | **वासुदेव शामराव राऊत,**<br>वय – ४८ वर्ष, धंदा – मजुरी,<br>रा. कोंढाळा,<br>ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. |
| **आरोपीतर्फे अधिवक्ता :** | **श्री. एस. एस. गुरू.** |

**भाग – ब**
**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (२)]**

| | |
|---|---|
| **घटनेचा दिनांक :** | २२/१०/२०२३ |
| **एफ.आय.आर. दिनांक :** | २२/१०/२०२३ |
| **दोषारोपपत्र दाखल दिनांक :** | २९/०३/२०२५ |
| **गुन्ह्याचा तपशील निश्चितीचा दिनांक :** | २९/०३/२०२५ |
| **पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक :** | ०९/०६/२०२५ |
| **निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक :** | ०५/०३/२०२६ |
| **निकाल दिनांक :** | १२/०३/२०२६ |
| **शिक्षा झाली असल्यास तो दिनांक** | ---- |

**आरोपीचा तपशील**

| **आ. क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामिन तारीख** | **दोषारोप /आरोप** | **दोषी / निर्दोष** | **शिक्षा** | **तुरुंगामध्ये न्यायालयीन बंदी कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वासुदेव शामराव राऊत | --- | २९/०८/२०२५ | ६५(फ) महाराष्ट्र दारुबंदी कायदा | निर्दोष | नाही | नाही |

**भाग – क**
**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (३)]**
**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने बोलाविलेल्या साक्षदारांची यादी**

| **क्र.** | **नाव** | **साक्षदाराचे स्वरुप** |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | वासुदेव कवळु कामठे (**नि.क्र.०६ च्या पुढे**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.२ | रोशन उत्तम अहिरकर (**नि.क्र.०६ च्या पुढे**) | पंच साक्षदार |

**बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी**

| **अ.क्र.** | **नाव** | **साक्षेचे स्वरुप** |
|---|---|---|
| ब.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

**न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी**

| अ. क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

मेटरीअल ऑब्जेक्ट/महत्त्वाच्या वस्तू

| अ. क्र. | मटेरिअल ऑब्जेक्ट /महत्त्वाच्या वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(जाहिर दिनांक १२/०३/२०२६)

आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (फ) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरिता संपरिक्षा चालविण्यात आली. खटल्याच्या न्यायनिर्णयाकरिता पुढील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील नमूद कारणांकरिता नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, दि. २२/१०/२०२३ ला अंदाजे १४:४० ते १५:२५ वाजताच्या दरम्यान, मौजा कोंढाळा, ता. देसाईगंज, जिल्हा गडचिरोली येथे आरोपी त्याच्या घरामध्ये १०० किलो मोहा सडवा अवैधरित्या विनापरवाना विक्रीकरिता बाळगुन मिळून आला ? | **...नाही** |
| २. | आदेश काय ? | **...अंतीम आदेशानुसार** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता** :–

२. आरोपीवर ठेवलेला दोषारोप सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने वासुदेव कवळु कामठे **(अ.सा.क्र.१)** व रोशन उत्तम अहिरकर **(अ.सा.क्र.२)** यांना तपासले. अभियोग पक्षातर्फे पुरसीस **(नि.क्र.१०)** दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरूद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे त्याचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१(१)(ब) अन्वयेचा जवाब वगळण्यात आला. रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल आहे.

३. वासुदेव **(अ.सा.क्र.१)** व रोशन **(अ.सा.क्र.२)** हे घटनास्थळ कम जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षदार आहेत. अ.सा.क्र.१ च्या साक्षेत असे आले की, तो आरोपीला ओळखत नाही तर अ.सा.क्र.२ आरोपीला ओळखतो. पोलीसांनी त्यांना पंचनामा

करण्यासाठी कोठेही बोलाविले नव्हते व त्यांच्या समक्ष कोणतीही कारवाई करण्यात आलेली नव्हती. त्यांनी घटनास्थळ कम जप्ती पंचनाम्यावर त्यांच्या सहया असल्याचे सांगितले आहे, तसेच त्यातील मजकुराबाबत त्यांनी अनभिज्ञता दर्शविली. त्यांनी उलटतपासात विचारल्या जाणारे उत्तर सुचक प्रश्न अभियोग पक्षाद्वारे विचारले असता त्यामध्येही त्यांनी पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्याकरिता मौजा कोंढाळा, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घरी बोलाविले होते, त्या ठिकाणी आरोपीच्या घरामधुन १०० किलो मोहा सडवा जप्त केला होता व त्याबाबतचा घटनास्थळ कम जप्ती पंचनामा त्यांच्यासमक्ष तयार केला होता व त्यावर त्यांनी सही केली होती, असे अभियोग पक्षाचे कथन त्यांनी नाकारले.

४. पंच साक्षदार फितूर झालेले आहेत. अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष न नोंदविल्यामुळे अभियोग पक्ष फिर्याद तसेच छापील प्रथम खबर अहवाल व त्यामधील मजकूर, घटनास्थळ कम जप्ती पंचनामा व त्यातील मजकूर सिद्ध करु शकला नाही. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सादर केलेला आहे, परंतु जप्त नमुने रासायनिक विश्लेषणाच्या कार्यालयात घेवून जाणारा कोणताही साक्षदार तपासलेला नाही. त्यामुळे नेमके कोणते जप्त नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते, तसेच अभिलेखावर दाखल रासायनिक विश्लेषणाचा अहवाल हा नेमका कोणत्या प्रकरणातील जप्त नमुन्यांचा आहे, हे स्पष्ट होत नाही. वर चर्चिलेल्या बाबी लक्षात घेता आरोपी मोहा दारू अवैधरित्या विनापरवाना विक्रीकरिता बाळगुन मिळून आला होता, ही बाब स्विकारार्ह नाही

तसेच अभियोग पक्ष ती बाब सिद्ध करु शकला नाही.

**५.** कलम ६५(फ) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा सिद्ध होण्यासाठी जप्त मुद्देमाल मोहा सडवा आहे व तो सडवा आरोपी विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना बाळगून होता, या बाबी सिद्ध होणे आवश्यक असते. तसेच, आरोपीकडून जप्त केलेल्या द्रावणापैकी रासायनिक परीक्षणाकरीता काढलेले द्रावण प्रथम मुद्देमाल मोहररकडे पोलीस स्टेशनमध्ये जमा केले आणि त्यानंतर मुद्देमाल मोहररपासून त्यामध्ये कोणतीही अदलाबदल किंवा अफरातफर न करता ते रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविले, याबाबत स्पष्ट असा साखळी पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक असते.

**६.** वरील सर्व बाबींचा विचार केला असता असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(फ) अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :-**

**७.** मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमाल मोहा सडव्यापैकी रासायनिक विश्लेषणाकरिता काढलेल्या मुद्देमालाव्यतिरिक्त इतर मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आलेला आहे, त्यामुळे त्याबाबत वेगळा आदेश करण्याची आवश्यकता नाही. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ (१) ची पुर्तता आधीच केलेली आहे. म्हणून मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपीला भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(फ) खालील गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचा जात मुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येते.

**(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.03.12 13:42:24 +0530

दिनांक : १२/०३/२०२६

**(सतिश गोपालराव गोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज.
JO CODE- MH02902